पीसीबी ११९०९ ११०९

**आरबीआय/२००९-१०/२११**

**युबीडी. बीपीडी. (पीसीबी) सीआयआर क्र १९/१३.०१.०००/२००९-१० नोव्हेंबर, ९,२००९**

सर्व प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांचे
मुख्य कार्यकारी अधिकारी.

महोदय,

**युसीबींमधील हक्क न सांगितलेल्या ठेवी आणि अकार्यकारी / सुप्त खाती**

कृपया आमचे ह्या विषयावरील परिपत्रक युबीडी क्र. डीएस. पीसीबी. सीआयआर. ९/१३.०१.००/२००८-०९ दि. सप्टेंबर १, २००८ चा संदर्भ घ्यावा. ह्या परिपत्रकाच्या परिच्छेद २ (६) अनुसार, एखाद्या खात्याचे “अकार्यकारी” असे वर्गीकरण करतेवेळी, ग्राहकांच्या वतीने तसेच तृतीय पक्षाव्दारे केलेले डेबिट तसेच क्रेडिट ह्यांचाही विचार केला जावा.

२) असेही काही प्रसंग असतील की जेथे ग्राहकाच्या स्थिर ठेवीवरील व्याज त्याच्या बचत खात्यात जमा करण्यासाठी ग्राहकाने मँडेट दिले असेल व त्या बचत खात्यात ह्याशिवाय अन्य कोणताही व्यवहार होत नसेल. असे खाते दोन वर्षांनंतर अकार्यकारी ठरवले जावे काय ह्याबाबत काही शंका निर्माण झाल्या आहेत.

३) ह्या संदर्भात आम्ही येथे स्पष्ट करीत आहोत की, ज्याअर्थी, ग्राहकाने दिलेल्या मँडेट अनुसार त्याच्या स्थिर ठेवीवरील व्याज त्याच्या बचत खात्यात जमा केले जात आहे त्याअर्थी जो व्यवहार ग्राहकाने/त्याच्या वतीने केलेला व्यवहार समजला जावा. त्यामुळे जोपर्यंत स्थिर ठेवीवरील व्याज ग्राहकाच्या बचत खात्यात जमा केले जात आहे तोपर्यंत ते बचत खाते कार्यकारी खाते समजले जावे. स्थिर ठेवीवरील व्याज जमा झाल्याची शेवटची नोंद केली गेल्यावर दोन वर्षांनी ते बचत खाते अकार्यकारी समजले जावे.

आपला,
(ए. के. खौंड)
मुख्य महाव्यवस्थापक